सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

# महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४

( दिनांक २४ जून, २००८ पर्यंत सुधारित )

# Maharashtra Act No. XXIII of 1994

# The Maharashtra Finance Commission (Miscellaneous Provisions) Act, 1994

*(As modified upto the 24th June, 2008)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०१२

[किंमत : रुपये ८]

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

# महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

३. आयोगाची रचना.

४. आयोगाचा अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी अर्हता आणि निवड करण्याची रीत.

५. व्यक्तिगत हितसंबंधामुळे अध्यक्ष आणि सदस्य निरर्ह ठरणे.

६. आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य होण्याबाबतच्या निरर्हता.

७. अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी व पुनर्नियुक्तीसाठी पात्रता.

८. अध्यक्ष व सदस्य यांची सेवा, वेतन व भत्ते यांच्या शर्ती.

९. आयोगाची कार्यपद्धती व अधिकार.

## सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.[१]

# महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४

[या अधिनियमास मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर तो **महाराष्ट्र शासन राजपत्रात** भाग चार, दिनांक २२ एप्रिल १९९४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ (१८-८-१९९५)†

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ @ (३-७-१९९९)†

**महाराष्ट्र वित्त आयोगाची रचना, त्याचे सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता, ज्या रीतीने त्यांची निवड करण्यात येईल ती रीत, त्यांचे अधिकार यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र वित्त आयोगाची रचना, त्याचे सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता, ज्या रीतीने त्यांची निवड करण्यात येईल ती रीत, त्यांचे अधिकार यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेत :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

**२.** या अधिनियमामध्ये,— व्याख्या.

(१) " अध्यक्ष " म्हणजे, आयोगाचा अध्यक्ष,

(२) " आयोग " म्हणजे, संविधानाच्या अनुच्छेद २४३झ च्या खंड (१) नुसार राज्यपालाने रचना केलेला वित्त आयोग,

**३.** आयोगामध्ये, अध्यक्ष व इतर चार सदस्य यांचा समावेश असेल. आयोगाची रचना.

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९९४, भाग पाच, इं. पृष्ठ १८९ पहा.

@ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३ द्वारे सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३३ निरसित करण्यात आला.

† या अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

*आयोगाचा अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी अर्हता आणि निवड करण्याची रीत.*

**४.** आयोगाचा अध्यक्ष, प्रशासन व वित्तव्यवस्था यांमध्ये निष्णात असलेला नागरी सेवेत असलेला अथवा सेवानिवृत्त झालेला उत्कृष्ट अधिकारी किंवा सार्वजनिक कामाचा अनुभव असलेली व्यक्ती असेल आणि इतर चार सदस्य पुढील व्यक्तींमधून निवडण्यात येतील :—

(अ) शासनाची वित्त व्यवस्था व लेखे यांचे विशेष ज्ञान असेल अशा व्यक्ती; किंवा

(ब) वित्तीय बाबी व प्रशासन यांचा परिपूर्ण अनुभव असेल अशा व्यक्ती; किंवा

(क) नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्याचे विशेष ज्ञान व अनुभव असेल अशा व्यक्ती; किंवा

(ड) ग्रामीण क्षेत्रातील स्थानिक स्वराज्याचे विशेष ज्ञान व अनुभव असेल अशा व्यक्ती :

परंतु, या सदस्यांपैकी एक सदस्य हा [१][भारतीय प्रशासन सेवेतील कनिष्ठ प्रशासकीय दर्जाच्या एखाद्या अधिकाऱ्यापेक्षा किंवा समतुल्य दर्जाच्या अधिकाऱ्यापेक्षा] कमी दर्जाचा नसेल असे पद जी धारण करीत असेल किंवा जिने धारण केलेले असेल अशी व्यक्ती असेल व तो आयोगाचा सदस्य-सचिव असेल.

*व्यक्तिगत हितसंबंधामुळे अध्यक्ष आणि सदस्य निरर्ह ठरणे.*

**५.** एखाद्या व्यक्तीची आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यापूर्वी, राज्यपाल, त्या व्यक्तीचे, आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून तिने करावयाच्या कामांवर प्रतिकूल परिणाम करण्याची शक्यता असेल अशा प्रकारचा कोणताही आर्थिक किंवा इतर हितसंबंध असणार नाही याबद्दल स्वतःची खात्री करून घेतील ; आणि राज्यपाल, आयोगाच्या प्रत्येक सदस्याच्या संबंधात देखील त्याचा असे कोणताही हितसंबंध नसल्याबद्दल वेळोवेळी स्वतःची खात्री करून घेतील आणि आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य असेल अथवा राज्यपालांनी आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून जिची नियुक्ती करण्याचे योजले असेल ती कोणतीही व्यक्ती, या कलमान्वयेची तिची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्यपालांस आवश्यक वाटेल अशी माहिती सादर करण्याचा आदेश राज्यपाल जेव्हा जेव्हा देतील तेव्हा तेव्हा ती माहिती सादर करील.

*आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य होण्याबाबतच्या निरर्हता.*

**६.** एखादी व्यक्ती आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास अथवा अध्यक्ष किंवा सदस्य असण्यास पुढील बाबतीत निरर्ह ठरेल :—

(अ) ती विकल मनाची असेल तर ; [२][आणि सक्षम न्यायालयाने ती तशी असल्याचे घोषित केलेले असेल]

---

१ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम २ द्वारे कलम ४ च्या परंतुकामधील, "शासनाच्या प्रधान सचिवापेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ब) ती अमुक्त नादार असेल तर ;

(क) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल तिला दोषी ठरवण्यात आलेले असेल तर ;

(ड) तिचा आर्थिक किंवा इतर हितसंबंध हा, आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून तिने करावयाच्या कामांवर प्रतिकूल परिणाम करण्याची शक्यता असेल अशा प्रकारचा असेल तर.

**अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी व पुनर्नियुक्तीसाठी पात्रता.**

७. आयोगाचा अध्यक्ष व प्रत्येक सदस्य, त्याच्या नियुक्तीसंबंधिच्या राज्यपालांच्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी पद धारण करतील, परंतु तो पुनर्नियुक्तीस पात्र असेल :

परंतु, त्याला त्याच्या सहीने राज्यपालास उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे कोणत्याही वेळी त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल.

**अध्यक्ष व सदस्य यांची सेवा, वेतन व भत्ते यांच्या शर्ती.**

८. आयोगाचा अध्यक्ष व सदस्य हे राज्यपाल प्रत्येकाच्या बाबतीत विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे आयोगास पूर्णकालिक किंवा अंशकालिक सेवा देतील ; व आयोगाचा अध्यक्ष व सदस्य यांना, राज्य शासन आदेशाद्वारे वेळोवेळी ठरवील अशी फी किंवा वेतन व असे भत्ते देण्यात येतील.

**आयोगाची कार्यपद्धती व अधिकार.**

९. (१) आयोग त्याची कार्यपद्धती निश्चित करील आणि त्याची कामे पार पाडताना, दाव्याची न्यायचौकशी करलेवेळी पुढील गोष्टींच्या बाबतीत, आयोगाला
१९०८ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व
चा ५. अधिकार असतील :—

(अ) साक्षीदारांना समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे ;

(ब) कोणतेही दस्तऐवज सादर करण्यास फर्माविणे ; आणि

(क) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागविणे.

(२) आयोगाला, त्याच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही बाबीच्या दृष्टीने आयोगाच्या मते उपयुक्त किंवा त्या बाबीशी संबंधित असतील अशा मुद्यांची किंवा बाबींची माहिती सादर करण्यास कोणत्याही व्यक्तीला फर्माविण्याचा अधिकार असेल, आणि असे फर्माविण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले
१८६० असले तरी, भारतीय दंड संहितेच्या कलम १७६ च्या अर्थानुसार अशी माहिती
चा ४५. सादर करण्यास कायद्याने बांधील असल्याचे मानण्यात येईल.

१८७४ (३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम ३४५ चे पोट-कलम (१) व
चा २. कलम ३४६ यांच्या प्रयोजनार्थ, आयोग, हे दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र राज्याच्या सीमा या, आयोगाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमा असतील.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई